# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)
**(०२३५८) २८२३८७**

अंक ८१/२०१८ | दिनांक ०९/१०/२०१८ | कालावधी ५ दिवस


| | | |
|---|---|---|
| डॉ. सुभाष चव्हाण, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०५/१०/२०१८ ते ०९/१०/२०१८) | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/१०/२०१८ सकाळी ८:३० पासून १४/१०/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५/१० | ०६/१० | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | १४/१० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३६.० | ३६.० | ३६.२ | ३५.८ | ३६.२ | कमाल तापमान (अं.से) | ३६ | ३५ | ३५ | ३६ | ३६ |
| २६.० | २५.० | २५.४ | २५.३ | २६.२ | किमान तापमान (अं.से) | २६ | २५ | २५ | २६ | २५ |
| ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ८ | ७ | ५ | ३ |
| ७६ | ८३ | ८८ | ८६ | ८८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८४ | ८३ | ८२ | ६९ | ५७ |
| ५२ | ५७ | ५९ | ५८ | ६३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४० | ४६ | ४८ | ३९ | ३१ |
| ३.४ | २.४ | २.७ | ३.१ | २.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ००३ | ००३ | ००४ | ००६ | ००६ |
| - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | ईशान्य-पूर्व | आग्नेय | ईशान्य | पूर्व | पूर्व |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | २३५९.६ | २८३४.२ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला
**दिनांक १० ते १४ ऑक्टोबर २०१८ पर्यंत आकाश मेघाच्छादित राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | दाणे भरण्याची अवस्था ते पक्वता | • गरव्या जातीचे भात पसवून दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ से. मी. पर्यंत ठेवावी.<br>• पाऊसाची उघडीप असताना तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळी कापणी करून लगेच मळणी करून भात उन्हामध्ये चांगले वाळवावे.<br>• भात पिकावर खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन २.५ टक्के ६ मिली प्रति १० लि. पाण्यातून फवारावे. |
| वाल/ कडवा वाल | पेरणी | • वालाची भात कापणी नंतर जमिनीच्या अंगओल्यावर विनामशागत पेरणी करण्यासाठी भात काढणीनंतर लगेच शेतातील तणांचे ग्लायफोसेट ५ मि. ली. प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. त्यानंतर कोणतीही मशागत न करता टोकन पद्धतीने दोन ओळीत ३० X १५ से.मी. अंतर ठेवून वालाची पेरणी करावी. पेरणी करते वेळी बियाण्याशेजारी भोक करून त्यामध्ये दाणेदार मिश्रखत गुंठ्यास एक किलो या प्रमाणे द्यावेत. |
| सुपारी | -- | • पाऊसाचे प्रमाण कमी असल्याने सुपारी बागेत आवशक्यतेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| चिकू | -- | • चिकू बागेमध्ये जुन्या झाडांची मुख्य फांदीची छाटणी व इतर फांद्यांची विरळणी करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | रोपवाटिका | • भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• कलमांच्या नवीन वाढणाऱ्या फुटीला काठ्यांनी आधार द्यावा तसेच कलमांवर विरळ सावली करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांचे, शेळ्यांचे आणि कोंबड्यांचे वाढत्या तापमानापासून संरक्षण करावे.<br>• जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठ्यामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**